आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता
२५ मार्च २०२६ - बुधवार

**ठळक बातम्या**

- अजित पवार यांच्या अपघात प्रकरणी घातपात आढळून आला तर दोषींना शिक्षा करण्याचं मुख्यमंत्र्यांचं विधानसभेत आश्वासन

- अशोक खरात प्रकरणाचा राजकारणासाठीच वापर होणार असल्याचा विरोधी पक्षांचा अंतिम आठवडा प्रस्तावावरच्या चर्चेत आरोप

- समाज माध्यमांवर महिलांची बदनामी रोखणाऱ्या भारतीय न्याय संहिता महाराष्ट्र सुधारणा विधेयकाला विधिमंडळाची मंजुरी

- पाइप गॅस सुविधा उपलब्ध असलेल्या विभागांमध्ये एलपीजी पुरवठा बंद करण्याचा केंद्र सरकारचा निर्णय

**आणि**

- राज्यात मंजुरी मिळालेली मनरेगाची २७ टक्क्यांहून अधिक कामं सुरू झाली नसल्याचा कॅगचा अहवाल

**<><><><><>**

अजित पवार यांच्या अपघातप्रकरणी सीआयडीकडून तपास योग्य दिशेनं सुरू आहा. यात काही घातपात आढळून आला तर कोणत्याही परिस्थितीत जबाबदार असणाऱ्या व्यक्तीला शिक्षा होईल, असं आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी दिलं. ते आज विधानसभेत अंतिम आठवडा प्रस्तावावरच्या चर्चेला उत्तर देताना बोलत होते.

या प्रकरणात एफ आय आर नोंदवणं शक्य नाही, जेव्हा पूर्ण चौकशी होईल आणि यात घातपात असल्याचं निष्पन्न झालं तर एडीआरचंच रुपांतर एफ आय आर मधे होईल असं ते म्हणाले. कर्नाटकात या प्रकरणी दाखल झालेला झिरो एफ आय आर बेकायदेशीर असल्याचं ते म्हणाले.

कांद्याचा प्रश्न सोडवण्यासाठी दीर्घकालीन उपाययोजनांची आवश्यकता असून सध्यस्थितीत कांदा उत्पादक शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी कृषी विभागाचे अपर मुख्य

सचिव, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव आणि पणन विभागाच्या सचिवांची समिती स्थापन करणार असल्याचं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं.

वैधानिक विकास महामंडळाच्या स्थापनेसाठी केंद्राकडे प्रस्ताव पाठवला आहे. मात्र मंडळ नसली तरी विदर्भ आणि मराठवाड्याला गरजेपेक्षा जास्त निधी वितरित केला जातो असं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं. सर्व घटकांना न्याय देण्याचा प्रयत्न सरकार करत आहे असं मुख्यमंत्री म्हणाले.

**<><><><><>**

विरोधी पक्षाच्या सदस्यांनी अंतिम आठवडा प्रस्तावावरच्या चर्चेदरम्यान मांडलेले मुद्दे ऐकूया आमच्या प्रतिनिधीकडून

- **- होल्ड व्हाइस कास्ट - - -**

*(एकनाथ शिंदे नवी दिल्ली दौऱ्यावर होती त्याच दिवशी अशोक खरात प्रकरण उघडकीला आलं. या प्रकरणाचा उपयोग राजकारणासाठीच होणार आहे असून यात कुणाचं नाव गोवायचं हे ठरवलं जाईल असा दावा नाना पटोले यांनी अंतिम आठवडा प्रस्तावाच्या दरम्यान बोलताना विधानसभेत केला. खरातचा कोठडीत मृत्यू होण्याची भीती असून त्याला चोवीस तास कॅमेऱ्याच्या निगराणीत ठेवावं अशी मागणी जितेंद्र आव्हाड यांनी केली.*

*उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघातप्रकरणी एफ आय आर दाखल व्हावा अशी मागणी जयंत पाटील यांनी केली. अवकाळी पावसामुळे झालेलं नुकसान, नदी शुद्धीकरण मोहिमेचं अपयश, कंत्राटदारांच्या बिलाची थकबाकी इत्यादी मुद्दे त्यांनी उपस्थित केले. सरकारी शाळांमध्ये शाळांमध्ये सोयीसुविधा पुरवण्याची मागणी नितीन राऊत यांनी केली.*

*राज्यात आज जर मंत्रीच संरक्षण मागत असतील, तर सर्वसामान्य नागरिकांनी काय करायचं, असा सवाल अनिल परब यांनी विधानपरिषदेत अंतिम आठवडा प्रस्तावावरच्या चर्चेला सुरुवात करताना उपस्थित केला. राज्यात अंमली पदार्थांचा वाढता विळखा, महिला सुरक्षा, बालकांवरचे अत्याचार, डिजिटल फसवणूक, डिजिटल अटक, अशोक खरात प्रकरण, पर्यावरणाचा ऱ्हास इत्यादी मुद्द्यांवरून त्यांनी सरकावर टीकास्त्र सोडलं.*

*दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाताची चर्चा लावावी अशी विनंती वारंवार करूनही ती झाली नाही, यावर शशिकांत शिंदे यांनी नाराजी व्यक्त केली.*

*सरकारचं काम अतिशय पारदर्शी पद्धतीनं सुरू आहे, अशी ग्वाही प्रवीण दरेकर यांनी दिली. पोलीस, सफाई कामगार, गिरणी कामगारांसाठी सरकार करत असलेल्या कामांचा उल्लेख त्यांनी केला.*

*विधानसभेतून कौस्तुभ पटाईतसह अंकिता आपटे विधानपरिषद मुंबई )*

<><><><><>

भारतीय न्याय संहिता महाराष्ट्र सुधारणा विधेयक २०२६ आज विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहात एकमताने मंजूर झालं. ॲसिड हल्ल्यातील पीडितेचं नाव उघड करू नये तसंच डिजिटल माध्यमांवर महिलेची बदनामी केली तर तो विनयभंग समजला जाईल अशा तरतुदी या विधेयकात आहेत.

विदर्भातल्या प्रत्येक जिल्ह्यात व्याघ्र प्रकल्प उभारण्याचा निर्णय सरकारनं घेतल्याचं वनमंत्री गणेश नाईक यांना विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात सांगितलं. नाना पटोले, किशोर जोरगेवर यांनी यासंदर्भात प्रश्न उपस्थित केला होता.

<><><><><>

सातारा जिल्हा परिषद अध्यक्षपदाच्या निवडणुकीवेळी मंत्री शंभुराज देसाई यांच्यासह इतरांसोबत पोलिसांनी केलेल्या वागणुकीप्रकरणी शासनानं चौकशी करून योग्य कारवाई करावी, असे निर्देश सभापती राम शिंदे यांनी दिले. याप्रकरणी उपसभापती नीलम गोऱ्हे यांनी दिलेले निलंबनाचे निर्देश, कायदातज्ज्ञ आणि घटनातज्ज्ञांकडे पाठवून नंतर त्यावर निर्णय जाहीर करू, असंही त्यांनी सांगितलं.

<><><><><>

सातारा जिल्हा परिषद गदारोळ प्रकरणी पोलीस अधीक्षकांना निलंबित केल्याप्रकरणावरून विधानपरिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे यांना पदावरून दूर करायची नोटीस विरोधी पक्षांनी दिली होती. मात्र नियमानुसार अशी नोटिस द्यायच्या आधी १४ दिवसांची नोटिस द्यावी लागते. त्यामुळे हा कालावधी संपल्यानंतर ही नोटिस सदनासमोर येईल, असं सभापती राम शिंदे यांनी सांगितलं.

<><><><><>

पाइप गॅस सुविधा उपलब्ध असलेल्या विभागांमध्ये एलपीजी पुरवठा बंद करण्याचा निर्णय केंद्र सरकारनं घेतला आहे. पीएनजी सुविधा उपलब्ध असूनही एलपीजीवर अवलंबून

राहणाऱ्या ग्राहकांना ३ महिन्यात पीएनजीची जोडणी घ्यावी लागेल, असं पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयानं काल प्रसिद्ध केलेल्या दिशानिर्देशात म्हटलं आहे.

पाइप गॅस जोडणी देणे तांत्रिकदृष्ट्या शक्य नसेल तर पुरवठादाराकडून ना-हरकत प्रमाणपत्र मिळाल्यावर एलपीजी जोडणी कायम ठेवता येईल, असं या निर्देशात स्पष्ट केलं आहे.

<><><><><>

पश्चिम आशियातल्या संघर्षामुळे देशात पेट्रोल आणि डिझेलच्या दरात वाढ होणार असल्याची अफवा पसरली असून प्रत्यक्षात दरांमध्ये वाढ झालेली नाही, असं पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाच्या संयुक्त सचिव सुजाता शर्मा यांनी नवी दिल्लीत वार्ताहर परिषदेत स्पष्ट केलं.

गेल्या २५ दिवसांत सुमारे अडीच लाख नवीन पीएनजी जोडण्या देण्यात आल्या असून २ लाख २० हजार ग्राहकांनी एलपीजीऐवजी पीएनजी वापरण्याचा निर्णय घेतल्याचं त्या म्हणाल्या.

<><><><><>

रेस्टॉरंटमध्ये येणाऱ्या ग्राहकांवर एलपीजी शुल्क, इंधन दरवाढ शुल्क न लादण्याचा इशारा केंद्रीय ग्राहक संरक्षण प्राधिकरणानं सर्व हॉटेल आणि रेस्टॉरंट चालकांना दिला आहे. अशा प्रकारचं अयोग्य शुल्क लादणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याचं प्राधिकरणानं म्हटलं आहे.

<><><><><>

राज्यात २०१९ ते २०२४ या कालावधीत मंजुरी मिळालेली मनरेगाची २७ टक्क्यांहून अधिक कामं सुरूच झाली नाहीत. सुमारे साडे १९ टक्के कामं पूर्ण झाली नाही असा अहवाल कॅगनं आज प्रसिद्ध केला. या कालावधीत मनरेगासाठी १३ हजार ९५७ कोटी रुपयांचा निधीची तरतूद केलेली होती. त्यातले साडे १३ हजार कोटी रुपये खर्च झाल्याचं अहवालात नमूद आहे, अशी माहिती राज्याचे प्रधान महालेखापाल डी. जयशंकर यांनी आज मुंबईत वार्ताहर परिषदेत दिली. अहवालानुसार राज्यातल्या ७५ टक्के कुटुंबांनी मनरेगावर ५० दिवसांपेक्षा कमी दिवस काम केलं. केवळ पावणे ९ टक्के म्हणजेच १ लाख ७१ हजार कुटुंबांनी १०० किंवा त्यापेक्षा जास्त दिवस काम केले. इतर कामाची उपलब्धता, इतर

कामातून मिळणारी अधिक मजुरी यामुळंही मजुरांनी मनरेगाच्या कामाकडे पाठ फिरवल्याचा अंदाज जयशंकर यांनी व्यक्त केला.

अमरावती, अहिल्यानगर, छत्रपती संभाजीनगर, धाराशीव, नागपूर आणि पालघर जिल्ह्यातले १२ तालुके आणि ४८ ग्राम पंचायतींमध्ये कॅगनं मनरेगाच्या कामाचे लेखापरीक्षण केलं होतं.

**<><><><><>**

राज्यातले अनेक उद्योग आवश्यक मंजुरीविना सुरू आहेत. अनेक ठिकाणी प्रक्रियेशिवाय पाणी आणि इतर पदार्थ नदी-नाल्यांमध्ये सोडले जात आहेत. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या २०१७ ते २०२२ या कालावधीतल्या कामकाजाच्या कॅगच्या लेखापरीक्षण अहवाल हे निरीक्षण नोंदवलं आहे.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या कारभारावर नियंत्रक आणि महालेखापरिक्षक अर्थात कॅग यांनी तीव्र नापसंती व्यक्त केली आहे.

**<><><><><>**

युद्धविरामाची शक्यता, स्वस्तात उपलब्ध असलेले समभाग, घसरलेल्या कच्च्या तेलाच्या किमती या कारणांमुळं देशातल्या शेअर बाजारात सुरू असलेली तेजी आज दुसऱ्या दिवशीही कायम राहिली. सेन्सेक्स आज १ हजार २०५ अंकांनी वधारुन ७५ हजार २७३ अंकांवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टी ३९४ अंकांनी वाढून २३ हजार ३०६ अंकांवर बंद झाला. सत्रादरम्यान दोन्ही निर्देशांकांमध्ये यापेक्षा जास्त तेजी झाली होती. गेल्या दोन दिवसात सेन्सेक्स सुमारे २ हजार ६०० अंकांनी वधारला असून यामुळं गुंतवणूकदारांच्या मालमत्तेत १५ लाख ८० हजार कोटी रुपयांची भर पडली आहे. अमेरिकन डॉलरच्या तुलनेत रुपया आज ९४ रुपये ५ पैशांच्या विक्रमी पातळीवर जाऊन बंद झाला.

**//<><><><><>//**